



■ २२ कॅरेट सोने दर : १,४०,१००/- ■ चांदी दर : २,३३,०००/-


शब्दांना सत्याची धार

# प्रहार




भारत-श्रीलंका कसोटीपूर्वीच वाद

पान ८


सिंधुदुर्ग • शुक्रवार ७ ऑगस्ट, २०२६ | RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ • वर्ष २२ • अंक २६९ • पाने ८ • ₹ ५.०० | www.prahaar.in epaper.prahaar.in


# 'जेन-झी' आणि 'जेन-अल्फा' जुन्या पिढीपेक्षा अधिक प्रामाणिक

## सरसंघचालक डॉ. मोहन भागवत : लोकशाहीत आंदोलनसुद्धा संवादाचेच एक माध्यम


**मुंबई**

"भारताच्या शिक्षणव्यवस्थेत अजूनही अनेक सुधारणा करण्याची गरज असून, त्या अपेक्षित वेगाने होत नसल्यामुळे असंतोष निर्माण होत आहे. मात्र, लोकशाहीत संवाद हाच सर्व प्रश्नांवर तोडगा काढण्याचा मुख्य मार्ग आहे. नीट परीक्षा गोंधळाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यावर उतरलेली आजची 'जेन-झी' आणि 'जेन-अल्फा' ही नवी पिढी विरोधासाठी विरोध करत नसून, त्यांच्या तक्रारी आणि नाराजी खऱ्या आहेत. ही पिढी आमच्या पिढीपेक्षा अधिक प्रामाणिक, तर्कसंगत उत्तरे मागणारी आणि देशभक्त आहे," असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी गुरुवारी केले. त्याचवेळी सरकारकडून 'जेन-झी'सोबत संवादाला विलंब झाल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

'इंडियाज इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनायटेड नेशन्स' या संस्थेच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित वार्षिक चॅम्पियनशिप परिषदेत ते बोलत होते. देशभरातील १०० हून अधिक शहरांमधील १५ ते १९ वयोगटातील दोन हजारांपेक्षा जास्त शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी त्यांनी या वेळी संवाद साधला. आपल्या संवादादरम्यान सरसंघचालकांनी शिक्षण व्यवस्था, आंदोलनाचे स्वरूप, लोकशाहीतील संवादाचे महत्त्व, एलजीबीटीक्यू समुदाय, महिलांचा सहभाग, पर्यावरण, बेरोजगारी आणि आरक्षण अशा विविध विषयांवर सविस्तर भूमिका मांडली.

"आम्ही लहान असताना मोठ्यांनी सांगितलेले प्रश्न न विचारता मान्य करायचो. मात्र, आजची तरुण पिढी प्रश्न विचारते; त्यांना तर्कसंगत उत्तरासोबतच आपुलकीही हवी असते," असे सांगत भागवत यांनी तरुणाईच्या भूमिकेचे समर्थन केले. "जेन-झी किंवा जेन-अल्फा पिढीने आंदोलन करू नये, असे म्हणणे अयोग्य आहे. संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणांमधून लोकशाहीत आपले प्रश्न मांडण्याचे मार्ग स्पष्ट मिळतात. शिक्षण क्षेत्रातील आंदोलने ही व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी असावीत, कोणा एकाच्या विरोधासाठी नाही. प्रश्न एवढा टोकाला जाण्यापूर्वीच संवाद सुरू झाला असता, तर अशी वेळ आली नसती. जेव्हा एखादा विषय एवढा ताणला जातो, तेव्हा यंत्रणेत कुठेतरी चूक किंवा उणीव राहिली आहे हे मान्य करावेच लागते," असे परखड मतही त्यांनी व्यक्त केले.

सरसंघचालक म्हणाले, "लोकशाहीत ज्याला इंग्रजीत 'डिबेट' म्हणतात, त्याला आपल्या परंपरेत 'शास्त्रार्थ' म्हणतात. शास्त्रार्थात पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष अशा सर्व बाजूंचा विचार करून सत्याचा शोध घेतला जातो. विविध आणि परस्परविरोधी मते एकत्र आल्यावरच सत्याचे व्यापक चित्र स्पष्ट होते. त्यामुळे अशा संवादाची लोकशाहीत अत्यंत गरज आहे. आंदोलन करणाऱ्या तरुणांना एखाद्या देशाचे 'एजंट' किंवा तत्सम विशेषणे लावणे पूर्णपणे चुकीचे आहे. ती आपलीच मुले असून देशाची भावी पिढी आहे. आंदोलनादरम्यान निरपराध तरुणांवर लाठीमार किंवा पेलेट गनचा वापर होण्याच्या घटनांबद्दल बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, याप्रकरणी पुरेशी खात्रीशीर माहिती नसताना निष्कर्ष



काढणे अयोग्य आहे. काही विघातक घटकांनी यात शिरकाव केल्याच्या बातम्या मी वाचल्या असल्या, तरी मला जर कोणावर विश्वास ठेवायचा असेल तर मी माझ्या देशाच्या 'जेन-झी' तरुणांवरच विश्वास ठेवेन", असेही त्यांनी सांगितले.

**शिक्षण व्यवस्थेत बदलांची गरज**

शिक्षणाच्या व्यापारीकरणावर चिंता व्यक्त करत डॉ. भागवत म्हणाले, "शिक्षण हा व्यवसाय नसून ती जीवनाची मूलभूत गरज आहे. त्यामुळे ते सर्वसामान्यांना सहज परवडणारे आणि उपलब्ध होणारे असले पाहिजे. शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी सरकारवर टाकून चालणार नाही, ती समाजाचीही संयुक्त जबाबदारी आहे. अनेक गावकऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन दानशूर व्यक्तींच्या मदतीने शाळांचा कायापालट केला आहे. शिक्षणाचा सर्व आर्थिक भार सरकारवर टाकण्याऐवजी समाजानेही यात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. यासोबतच शिक्षकांचे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे असून, सुधारणेची सुरुवात शिक्षकांपासूनच झाली पाहिजे. शाळा चालवणे किंवा पैसा कमावणे हा उद्देश नसून पुढची पिढी घडवणे हाच शिक्षणाचा मूलमंत्र हवा. तुम्हाला (मोदी सरकार) सत्तेत १५ वर्षे पूर्ण झाली आहेत, आता सरकारने शिक्षण क्षेत्रात एखादा ठोस प्रकल्प हाती घेऊन समाजाला सोबत घेऊन सकारात्मक बदल घडवून आणावेत", अशी सूचनाही त्यांनी केली. समाजात शिक्षणाविषयी निष्ठा आणि प्रेरणा जागी झाली, तर कोणताही राजकीय नेता किंवा सरकार जनतेच्या या मागणीकडे दुर्लक्ष करू शकणार नाही आणि त्यासाठी मोठ्या आंदोलनांचीही गरज उरणार नाही, असेही ते म्हणाले.

**सोशल मीडियावर निर्बंध आणावेत का?**

सोशल मीडियावरील निर्बंध आणि बंदीच्या चर्चांवर बोलताना सरसंघचालक म्हणाले, "काही देशांनी १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियाच्या वापराबाबत नियम केले आहेत. मात्र, केवळ कायदे करून प्रश्न सुटत नाहीत; तर समाजाची मानसिकता बदलली पाहिजे. ज्यांचे लाखो फॉलोअर्स आहेत, अशा रोल मॉडेल्सनी आपल्या कृतीतून इतरांना चुकीच्या मार्गावर नेणार नाही, याचा विवेक ठेवला पाहिजे.

(पान २ वर)

# शेतकऱ्यांच्या पशुधनाला आता विम्याचे कवच; ८५% खर्च सरकार उचलणार!



- गायी, बैलासाठी कमाल ७० हजार, म्हशी, रेड्यासाठी ८० हजाराची नुकसान भरपाई
- अपघात, नैसर्गिक आपत्ती व रोगामुळे पशुधन मृत्यू झाल्यास आर्थिक संरक्षण
- प्रत्येक कुटुंबातील १० पशुधन घटकांस मिळणार लाभ
- पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांची माहिती

**मुंबई**

राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत राज्यात पशुधन विमा योजना राबविण्यास सरकारने प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे. या योजनेमुळे पशुपालक शेतकऱ्यांना अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा रोगामुळे पशुधनाचा मृत्यू झाल्यास आर्थिक संरक्षण मिळणार असल्याची माहिती पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. यासंदर्भात अधिक माहिती देताना मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले की, हवामानातील अनपेक्षित बदल, नैसर्गिक आपत्ती, विषबाधा, सर्पदंश, दूषित पाणी, अपघात तसेच लम्पी स्कीनसारख्या साथीच्या रोगांमुळे पशुधनाचे मोठे नुकसान होते. त्यामुळे पशुपालकांचे आर्थिक स्थैर्य टिकविणे, त्यांना तातडीने नुकसानभरपाई मिळणे आणि कर्जबाजारी होण्यापासून संरक्षण मिळावे या उद्देशाने ही योजना प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

अपघात, पूर, वीज पडणे, दुष्काळ, वादळ, वणवा, (पान २ वर)

### मृत्यू दावा १५ दिवसांच्या आत

सर्व आवश्यक कागदपत्रे पूर्ण झाल्यानंतर विमा कंपनीने १५ दिवसांच्या आत दावा थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात डीबीटीद्वारे जमा करणे बंधनकारक राहील. १५ दिवसांनंतर विलंब झाल्यास लाभार्थ्याला वार्षिक १२ टक्के व्याजदराने अतिरिक्त भरपाई द्यावी लागणार आहे. दावा नाकारल्यास त्याचा पुनर्विचार करण्यासाठी प्रादेशिक आणि राज्यस्तरीय समित्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. दाव्यांच्या नोंदणीसाठी आणि जलद निकाली काढण्यासाठी विमा कंपनीकडून मराठी व इंग्रजी भाषेतील ऑनलाइन पोर्टल विकसित करण्यात येणार असून जिल्हास्तरावर मदत कक्ष, ग्राहक सेवा क्रमांक आणि तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध करून दिली जाणार आहे. योजनेचा प्रचार दूध संकलन संस्था, गो-मित्र आणि पंचायत राज संस्थांच्या माध्यमातून केला जाणार आहे.

# फळपिक विमा भरपाईचा मार्ग मोकळा होणार


## वंचित शेतकऱ्यांसाठी पालकमंत्री ना. नितेश राणे यांचा पुढाकार

### १० ऑगस्टला मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक

**कणकवली**

पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना २०२५-२६ अंतर्गत तांत्रिक त्रुटींमुळे भरपाईपासून वंचित राहिलेल्या सिंधुदुर्गातील शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी पालकमंत्री ना. नितेश राणे यांच्या पुढाकाराने १० ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता मंत्रालयातील त्यांच्या दालनात उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सतीश सावंत यांनी तांत्रिक



अडचणींमुळे अनेक शेतकरी विमा अनुदानापासून वंचित राहिल्याचा मुद्दा पालकमंत्री नितेश राणे यांच्या निदर्शनास आणून दिला होता. तसेच संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन हा प्रश्न



तातडीने मार्गी लावण्याची मागणीही केली होती. त्यानंतर पालकमंत्र्यांनी तत्काळ दखल घेत ही महत्त्वपूर्ण बैठक बोलावली आहे.

या बैठकीस कृषी सचिव, कृषी आयुक्त, सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी, भारतीय कृषी विमा कंपनी (नवी दिल्ली) (पान २ वर)

# ज्येष्ठ साहित्यिक श्रीनिवास कुलकर्णी यांचे निधन

- कराडमध्ये घेतला अखेरचा श्वास
- 'डोह, सोन्याचा पिंपळ'मधून चोखाळल्या अनवट वाटा!



**कोल्हापूर**

'डोह', 'सोन्याचा पिंपळ' सारख्या अक्षर ललित वाङ्मयाने उभ्या महाराष्ट्राला वेड लावणारे ज्येष्ठ साहित्यिक श्रीनिवास विनाय कुलकर्णी यांचे गुरुवारी ६ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता कराड येथे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. मराठी ललित साहित्याला आपल्या संवेदनशील आणि चित्रदर्शी लेखनाने समृद्ध करणारा साहित्यिक म्हणून त्यांची वेगळी ओळख होती. डोह, सोन्याचा पिंपळ सारख्या अनवट ललित कलाकृतीचे लेखन त्यांनी केले. श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना महाराष्ट्र शासनाच्या मानाच्या 'विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार,

(पान २ वर)

# प्रत्येक ग्रामपंचायतीत 'उद्योजक विचार मंच'; गावागावांतून घडणार नवे उद्योजक

### १५ ऑगस्टच्या ग्रामसभेत होणार चर्चा : वर्षाला किमान एक उद्योजक घडविण्याचा सिंधुदुर्ग जि. प.चा संकल्प



**सिंधुनगरी (प्रतिनिधी)**


ग्रामीण भागातील उद्योगक्षमतेला चालना देत गावागावांत रोजगारनिर्मितीचे नवे पर्व सुरू करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद प्रशासनाने प्रत्येक ग्रामपंचायतीत 'उद्योजक विचार मंच' स्थापन करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार नारायण राणे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून हा उपक्रम राबविण्यात येणार असून, १५ ऑगस्टच्या ग्रामसभेत याबाबतचा (पान २ वर)

### ग्रामपंचायतीत सात सदस्यांची समिती

प्रत्येक ग्रामपंचायतीत सात सदस्यांची उद्योजक विचार मंच समिती स्थापन करण्यात येणार आहे. सरपंच, ग्रामसेवक, स्थानिक यशस्वी उद्योजक, शिक्षक, डॉक्टर आणि १५ ते २९ वयोगटातील युवकांचा त्यात समावेश असेल.

# भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष राजेश सावंत यांचे निधन

## शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार



**रत्नागिरी (वार्ताहर)**

भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रत्नागिरीचे माजी जिल्हाध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष राजेश सावंत (वय ५५) यांचे बुधवार ५ ऑगस्ट रोजी रात्री हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले. राजेश सावंत यांच्या अकाली निधनाची बातमी रात्री जिल्ह्यात पसरताच संपूर्ण रत्नागिरीवासीयांतून शोक व्यक्त करण्यात आला. आज गुरुवारी दुपारी स्टेट बँक कॉलनी येथील त्यांच्या निवासस्थानावरून अंत्ययात्रा निघाली.

(पान २ वर)

> माझे जुने सहकारी व भाजपचे माजी दक्षिण रत्नागिरी जिल्हाध्यक्ष राजेश सावंत यांच्या अकस्मात निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो. या दुःखद प्रसंगी सावंत कुटुंबीयांच्या दुःखात मी सहभागी असून, त्यांना हे दुःख सहन करण्याचे बळ लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.
>
> **- आ.निलेश राणे**

### कर्तव्यदक्ष आणि लोकप्रिय नेतृत्व हरपले

भाजपाचे माजी दक्षिण रत्नागिरी जिल्हाध्यक्ष राजेश सावंत यांच्या अकस्मात निधनाची बातमी अतिशय दुःखद आणि वेदनादायी आहे. रत्नागिरी जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी आणि पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी त्यांनी समर्पित भावनेने कार्य केले. त्यांचा स्पष्टवक्तेपणा, कार्यकर्त्यांशी असलेला जिव्हाळा आणि संघटन कौशल्यामुळे त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनाने एक निष्ठावान, कर्तव्यदक्ष आणि लोकप्रिय नेतृत्व हरपले. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली! ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो. सावंत कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. भावपूर्ण श्रद्धांजली!

- **नितेश राणे,** मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री

# अपात्रतेचा निकाल लागल्यानंतर 'चिन्हा'चा मुद्दा दुय्यम ठरेल

### सर्वोच्च न्यायालयाची महत्त्वपूर्ण निरीक्षणे

**नवी दिल्ली**

सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणाची सुनावणी पार पडली. यावेळी न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी काही महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली.

(पान २ वर)

## शिवसेना कोणाची? जनतेनेच निकाल दिला

### विरोधकांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा घणाघात

**मुंबई**

शिवसेना पक्षाच्या मालकीबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर कडाडून हल्ला चढवला आहे. "शिवसेना कोणाची, याचा निकाल महाराष्ट्राच्या जनतेने आधीच दिला आहे. आम्ही चाळीस आमदारांसह बाहेर पडलो आणि जनतेने आम्हाला साठ आमदारांपर्यंत पोहोचवून आपल्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले," असा ठाम दावा त्यांनी केला. जनतेच्या न्यायालयात आपला विजय आधीच झाल्याचे सांगत, आता न्यायालयीन प्रक्रियेवरही पूर्ण विश्वास असल्याचे (पान २ वर)

# केंद्रीय शासकीय नोकरीचे आमिष; पाच जणांची तब्बल १.२० कोटींची फसवणूक

- कणकवली पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा
- दिल्लीत मेडिकल, बनावट नियुक्तीपत्रे व प्रशिक्षणाच्या नावाखाली आर्थिक गंडा घातल्याचा आरोप

**कणकवली**

केंद्रीय शासकीय विभागात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून पाच पालकांकडून तब्बल १ कोटी २० लाख रुपये उकळून फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एफसीआय) तसेच मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट अँड हायवेज ऑफ इंडिया या विभागांच्या नावाने बनावट नियुक्तीपत्रे देत आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी कणकवली पोलीस ठाण्यात विनिता विवेक मुंज (रा. कणकवली), सुबत्ता गिरीश माळी (रा. पुणे) आणि मनोज जैन यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सेवानिवृत्त नेत्रचिकित्सक अधिकारी सुनील दामोदर धुरे (रा. कलमठ, ता. कणकवली) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत सविस्तर माहिती दिली आहे.

पोलीस तक्रारीनुसार, फिर्यादी यांच्या पत्नी सुनीता धुरे या फोंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सहायिका म्हणून कार्यरत असताना त्यांची ओळख विनिता मुंज हिच्याशी झाली होती.

(पान २ वर)